


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३९३ वा गुरूवार दि १८ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# शिंदेंची बार्गेनिंग पॉवर वाढणार, महाराष्ट्राचं नेतृत्व करण्याची इच्छा पूर्ण होणार? भाजपच्या गोटात चलबिचल...

**वृत्तसंस्था-मुंबई**

बहुचर्चित ऑपरेशन टायगर शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी यशस्वी करून दाखवल्याने राज्यातील भाजपच्या गोटात काहीशी चलबिचल असल्याचे समजते. दिल्लीतील भाजपश्रेष्ठींच्या आशीर्वादानेच शिंदे यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाचे नऊपैकी सहा खासदार गळाला लावले. शिंदे या फुटीर खासदारांचे बळ भाजपच्या मागे उभे करणार आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात त्यांना या धाडसी कामगिरीची बक्षिसी मिळण्याची शक्यता बळावली आहे. शिंदे यांचे राजकीय वजन वाढल्यास त्याला तोंड देताना भाजपच्या राज्यातील नेत्यांना कसरत करावी लागणार असल्याचे बोलले जात आहे. लोकसभा-विधानसभा मतदारसंघ पुनर्रचना, महिला आरक्षण विधेयक नव्याने मांडून ते मंजूर करून घेण्यासाठी केंद्र सरकारला अधिकाधिक खासदारांच्या पाठिंब्याची गरज आहे. शिंदे यांनी खेचलेल्या सहा खासदारांमुळे एनडीएचे लोकसभेतील संख्याबळ वाढणार असून शिवसेनेच्या खासदारांची संख्या सातवरून १३ होणार आहे. शिवसेनेची ङ्गबार्गेनिंग पॉवरफवाढणार असून, शिंदे त्यांची राज्याचे नेतृत्व करण्याची इच्छा पूर्ण करण्याची शक्यता वर्तवली जाते. ऑपरेशन टायगरफ्बद्दल भाजपश्रेष्ठींनी शिंदेंना नेमके काय आश्वासन दिले, हे येत्या काळात स्पष्ट होईल. शिवसेना (उबाठा) संसदीय पक्षात उभी फूट पडल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही राज्यातील भाजपच्या नेत्यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या ङ्गऑपरेशनफ्ची कल्पना होती, असे सांगितले जाते. फडणवीस यांनी दिल्लीत दिवसभर घडलेल्या राजकीय घटनांवर मात्र कोणतेही भाष्य केले नाही. बरोबर चार वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी जून २०२२मध्ये शिवसेनेत बंड केले होते. त्यानंतर राज्यात युतीचे सरकार स्थापन होताना त्याची धुरा फडणवीस यांच्याकडे जाईल, असा कयास होता. मात्र, प्रत्यक्षात भाजपने शिंदे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आणि त्यांना मुख्यमंत्रिपद मिळाले. ठाकरे गटातील आजच्या फुटीमुळे चार वर्षांपूर्वीच्या घटनाक्रमाला पुन्हा उजाळा मिळाला आहे. ङ्गऑपरेशन टायगरफ्च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या नेत्यांनी आपल्या खासदारांशी संपर्क साधल्याचे समजते. लोकसभेत पक्षाचे आठ खासदार आहेत. त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न भाजपकडून होऊ शकतो. त्यानुसार पक्षातील नेत्यांनी या खासदारांशी वैयक्तिक संपर्क साधल्याचे समजते. पक्षातील फुटीची कुणकुण लागलेल्या शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी १४ जून रोजी पक्षाच्या सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. तरीही पक्षातील फूट रोखण्यात त्यांना अपयश



आले. फुटीर खासदार लोकसभा अध्यक्षांना भेटणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ठाकरे गटाचे संजय राऊत, अनिल देसाई, अरविंद सावंत हे मंगळवारी रात्रीच दिल्लीत दाखल झाले. या तिघांनी बुधवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. परंतु, उद्धव ठाकरे यांच्याकडून दिवसभरात कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आली नाही. सगळ्या घडामोडी स्पष्ट होईपर्यंत ठाकरे हे ङ्गवेट अँड वॉचफ्च्या भूमिकेत असल्याचे सांगण्यात येते.

# ठाकरेंची सेना पुन्हा फुटली! मोदी सरकारकडून टार्गेट सेट; दक्षिणेकडेही लक्ष, शरद पवार काय करणार?

**वृत्तसंस्था-नवी दिल्ली**

आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस पाठोपाठ शिवसेना उबाठाचे खासदार फुटले आहेत. लोकसभेत ठाकरेंचे ९ खासदार आहेत. ऑपरेशन टायगर लक्षात घेता उद्धव ठाकरेंकडून सर्व खासदारांची बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीला ९ पैकी केवळ ३ खासदार उपस्थित राहिले. त्यामुळे ठाकरेंची अडचण वाढली आहे. गेल्या ३ महिन्यांत ३ पक्षांचे खासदार फुटले आहेत. १७ एप्रिल २०२६ रोजी मोदी सरकारकडून महिला आरक्षण सुधारणा विधेयक लोकसभेत मांडण्यात आलं. त्या आडून मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्याचा भाजपचा प्रयत्न होता. पण इंडिया आघाडीनं एकत्र राहून विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. घटना दुरुस्ती विधेयक असल्यानं विधेयकाच्या बाजूनं दोन तृतीयांश मतदान गरजेचं होतं. विधेयकाच्या बाजूनं २९८ मतं पडली, तर २३० मतं विरोधात गेली. लोकसभेत विशेष बहुमत (दोन तृतीयांश) मिळवणं एक मोठी प्रक्रिया आहे. पण एनडीए दोन तृतीतांश बहुमताच्या जवळ आहे. लोकसभेत एनडीएचं संख्याबळ ३१४ वर पोहोचलं आहे. तृणमूलचे २० खासदार फुटल्यानं एनडीएचा आकडा ३०० च्या पुढे गेला. आता ६ खासदारांनी ठाकरेंची साथ सोडल्यानं हाच आकडा ३२० वर पोहोचला आहे. लोकसभेत ५४३ जागा आहेत. त्यामुळे दोन तृतीयांश बहुमतासाठी ३६२ चा आकडा आहे. तीन जागा रिक्त असल्यानं बहुमताचा आकडा ३६० वर येतो. १७ एप्रिल २०२६ रोजी मतदान झालं, तेव्हा १२ खासदार अनुपस्थित राहिले. त्या दिवशी ५२८ खासदार हजर होते. त्यांनी मतदान केलं. तेव्हा दोन तृतीयांश मतदानासाठी ३५२ चा आकडा गरजेचा होता. पण सत्ताधाऱ्यांना २९८ मतं मिळवता आली. म्हणजेच ५४ मतं कमी पडली. १७ एप्रिलची परिस्थिती पुन्हा निर्माण झाल्यास आता एनडीएकडे २६ अधिकची मतं असतील. तृणमूलचे २० आणि ठाकरेंचे ६ खासदार आता सरकारच्या बाजूनं मतदान करतील. १७ एप्रिलला एनडीएला ५४ मतं कमी पडली होती. त्यापैकी २६ मतांची सोय झालेली आहे. पण तरीही २८ खासदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. अशा स्थितीत मोदी सरकारचं लक्ष तमिळनाडूतील एम. के. स्टॅलिन यांच्या द्रमुककडे लागून आहे. या पक्षानं इंडिया आघाडीची साथ सोडलेली आहे. एनडीएच्या गोटातील वरिष्ठ नेते सध्या द्रमुकच्या नेत्यांशी संवाद साधत आहेत. तमिळनाडूतील विधानसभा निवडणूक निकालानंतर काँग्रेसनं द्रमुकची साथ सोडल्यानं द्रमुक नाराज आहे. याच कारणामुळे त्यांनी इंडिया आघाडीची साथ सोडली. द्रमुकचे लोकसभेत २२ खासदार



आहेत. ते जर एनडीएच्या बाजूनं उभे राहिले तर दोन तृतीयांश बहुमताच्या आकड्याच्या अगदी जवळ जाता येईल. बहुमतापासून एनडीए अवघ्या ६ जागा दूर असेल. अशा स्थितीत इंडिया आघाडीतील लहान पक्षांना आपल्या बाजूनं वळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. या परिस्थितीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिकादेखील महत्त्वाची ठरते. त्यांच्याकडे ८ खासदार आहेत.

# युद्ध संपले; शांतता नांदेल?



शंभरहून अधिक दिवस सुरू असलेले युद्ध संपविण्याबाबत अमेरिका आणि इराण यांच्यातील सहमती केवळ पश्चिम आशियासाठी नव्हे, तर साऱ्या जगासाठी दिलासा देणारी असली, तरी यामुळे आखातात खरोखरीच शांतता नांदेल काय, हा प्रश्न आहे. कारण, ज्याच्या भरीला पडून अमेरिकेने इराणच्या विरोधात हे युद्ध छेडले, तो इस्रायल या कराराचा भाग नाही. इराणच्या अणुकार्यक्रमाबद्दलची आणि इराणचे पाठबळ असलेल्या दहशतवाद्यांबद्दलची इस्रायलची भूमिका कायम आहे. याच भूमिकेतून आपल्या संरक्षणार्थ लढा कायम ठेवणार असल्याचे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या वक्तव्यातून सूचित होते. इस्रायलने लेबनानमधील तळ कायम ठेवल्यास ते कराराचे उल्लंघन ठरेल, असा इशारा इराणने दिला आहे. अमेरिका आणि इराण हे दोन्ही देश येत्या शुक्रवारी जीनिव्हा येथे सहमतीच्या करारावर सही करायच्या आधी असलेली ही स्थिती युद्धसमाप्तीच्या भविष्यावर भाष्य करणारी म्हणावी लागेल. असे असले, तरी हा करार स्वागतार्ह ठरतो, यात शंका नाही. या युद्धाची व्याप्ती पश्चिम आशियापुरता असली, तरी त्याचा फटका संपूर्ण जगाला बसत होता. होर्मुझच्या सामुद्रधुनीमुळे झालेल्या इंधनकोंडीने भारतासह अनेक देशांत सर्वसामान्यांच्या जगण्यावर विपरीत परिणाम होत होता. भारताला तर जीवितहानीही सहन करावी लागली होती. त्यामुळे युद्ध थांबणे गरजेचे होते. नेतान्याहू यांचा दुराग्रह, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची उलट-सुलट भूमिका आणि प्रत्युत्तराची इराणची असलेली क्षमता यांमुळे युद्ध लांबत गेले. आता युद्धसमाप्ती झाली ते चांगले झाले. सहमतीच्या करारातील विस्तृत तपशील शुक्रवारीच जाहीर होणार असला, तरी तो चार ठळक मुद्द्यांवर असणार हे उघड आहे. त्यातील एक म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. ती खुली होणार असल्याचे दोन्ही देशांनी स्पष्ट केले असून, करारावर सह्या झाल्यानंतर अमेरिका इराणच्या बंदरांवरील बंदीही उठवेल. या चिंचोळ्या पट्टीतील जलवाहतुकीचे नियंत्रण इराण आणि ओमन करणार असल्याचे सांगितले जाते; मात्र याबाबतचा प्रस्ताव अमेरिकेने पूर्वी नाकारला होता. त्यामुळे अमेरिका काय भूमिका घेणार, हे पहावे लागेल. दुसरा मुद्दा आहे, तो इराणच्या अणुकार्यक्रमाचा. अण्वस्त्रांच्या उत्पादनाला किंवा ती हस्तगत करण्याला इराणने नकार देण्याच्या मुद्द्यावर दोहोंची सहमती आहे; परंतु इराणकडील समृद्ध युरेनियमच्या साठ्याचे काय करायचे हा प्रश्न आहे. त्यावर पुढील साठ दिवसांत वाटाघाटी होणार आहेत. वास्तविक, दीड वर्षाच्या वाटाघाटीनंतर २०१५मध्ये, इराणवरील अणुकार्यक्रमावर निर्बंध घालण्याच्या बदल्यात त्याला आर्थिक लाभ देण्याचा करार झाला होता. तो ट्रम्प यांना मान्य नव्हता. तिसरा मुद्दा म्हणजे निर्बंधांचा. अमेरिका विशिष्ट कालावधीसाठी इराणवरील तेलनिर्बंध उठवेल आणि अंतिम करारानंतर तो पूर्णपणे उठवेल; तसेच इराणची २५ अब्ज डॉलरची गोठवलेली मालमत्ता मोकळी करेल, असे सांगितले जाते. त्यात रोख रकमेचाही समावेश आहे. मात्र, रोख रक्कम देणार नसल्याची भूमिका ट्रम्प यांनी घेतली होती. शेवटचा मुद्दा लेबनॉनचा. करारावर सह्या झाल्यानंतर इस्रायलने लेबनॉनवरील हल्ले थांबविणे अपेक्षित आहे. मात्र, इस्रायलने तशी हमी दिलेली नाही. त्याचबरोबर लेबनॉनमध्ये उभारलेले संरक्षण तळही कायम राहणार असल्याचे इस्रायलच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे प्रत्येक मुद्द्यांच्या पूर्ततेत अडथळे आहेत. ते कसे दूर करणार यावर कराराचे यश अवलंबून असेल. पॅलेस्टाइनबाबत तोडगा काढणे, हाच शाश्वत शांततेबाबतचा मार्ग दिसतो. मात्र, इस्रायलचा दुराग्रह; हिजबुल्ला, हमास, हुती यांसारख्या दहशतवादी संघटना आणि त्यांना इराणकडून मिळणारे पाठबळ यांमुळे उभयपक्षी मान्य होईल, असा तोडगा सध्या तरी दृष्टिपथात नाही. गाझामधील युद्ध गुन्हेगारी, ङ्गहमासफ्वे नि:शस्त्रीकरण आणि पॅलेस्टाइनचे भवितव्य याबाबत सध्या तरी काही नाही. अमेरिका-इराण यांच्यातील युद्धसमाप्तीचा करार अशा प्रकारे वरवरचा ठरतो. तरीही तो सध्या आवश्यक असून, भारतासह अनेक देशांना तो मदतकारकही आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाल्याने इंधनपुरवठा सुरळीत होऊ शकेल, तेलाच्या किमती कमी होतील, रुपयावरील ताणही कमी होईल. युद्धसमाप्तीचे स्वागत करतानाच, कायमस्वरूपी शांततेसाठी प्रयत्नांची गरज अधोरेखित करणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ममता बॅनर्जींनंतर आता उद्धव ठाकरेंना महाधक्का; 6 खासदारांचा गट शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होणार

**दिल्ली/वृत्तसंस्था**

राज्याच्या राजकरणातुन एक मोठी बातमी समोर येत आहे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या पक्षातून 6 खासदार फुटले असल्याची माहिती समोर येत आहे... तृणमूलच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांच्या पक्षात देखील नुकतीच मोठी फूट पडली होती. 20 खासदारांनी पक्षातून फुटून वेगळा गट स्थापन केला आणि त्यानंतर ते दुसऱ्या पक्षात विलीन झाले.

त्यांनंतर महाराष्ट्रात एका बड्या पक्षात सर्व काही ठीक नसल्याचं बोललं जात होतं.. हा पक्ष दुसरा तिसरा कोणता नसुन उद्धव ठाकरे यांचा पक्ष आहे. तृणमूलच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांच्या पक्षात देखील नुकतीच मोठी फूट पडली ही घटना ताजी असतानाचउद्धव ठाकरे यांना देखील मोठा धक्का बसला आहे.... गेले बरेच दिवसांपासुन ऑपरेशन टायगर अंतर्गत हे सहा खासदार शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या आज याला पुर्णविराम मिळाला आहे.



शिवसेना ठाकरे गटांचे सहा खासदार अखेर शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल होणार हे निश्चित झालं आहे. सहा फुटीर खासदारांचा गट देखील स्थापन झाल्याची माहिती आहे. गटस्थापनेनंतर शिवसेनेत हे सर्व सहा खासदार शिंदेंच्या शिवसेनेत जाणार आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार आता शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल होत आहेत. या खासदारांनी गट स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे, या गटस्थापनेनंतर आता ते शिवसेनेत विलीन होणार आहेत. तर दुसरीकडे ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र दिलं होतं. त्यानंतर देखील गटाची स्थापना झाली आणि विलीनीकरण होणार हे निश्चित झालं आहे.

गेले बऱ्याच दिवसांपासुन शिवसेना ठाकरे गटात ठीक नसल्याचे बोललं जात होतं... शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याच्या चर्चा सुरु होत्या... त्यामुळे सावध भूमिका घेत शिवसेना ठाकरे गटाच्या सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. मात्र या बैठकीला 9 पैकी केवळ 4 खासदारच प्रत्यक्ष उपस्थित होते. बाकी 6 खासदार बैठकीला उपस्थित नव्हते... परंतु खा. संजय राऊत यांनी या चर्चांना कोणतेही तथ्य नसल्याचे बोलत 6 खासदार 5 व्हिसीद्वारे उपस्थित असल्याचा दावा केला होता. तसेच या अफवांवर विश्वास ठेवु नका असे सांगितले होते.. पण आज अखेर या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

# विधान परिषदेच्या ६ जागा आधीच बिनविरोध; उर्वरित ११ जागांवर महायुतीने लावली प्रतिष्ठा

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघांत आज गुरुवारी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी गेले महिनाभर पर्यटनाला गेलेले महापालिका नगरसेवक आज आपल्या मतदार संघात परतले असून उद्या होणाऱ्या मतदानाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. सहा मतदारसंघांतील निवडणूक ही बिनविरोध झाली आहे. मतदारांचे पुरेशे संख्याबळ सोबत नसल्याने किंवा महायुतीचा मुकाबला करण्याची ताकद नसल्याने महाविकास आघाडीच्या काही उमेदवारांनी रणधुमाळीपूर्वीच महायुतीच्या उमेदवारांशी हातमिळवणी करीत आपली उमेदवारी मागे घेतली. त्याचा महायुतीला फायदा झाला.

सहा जागा बिनविरोध जिंकलेल्या महायुतीने उर्वरित ११ जागा जिंकण्यासाठी सारी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. मतदारराजाला खुश करीत मतांची योग्यपणे जुळवाजुळव केली आहे. नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवकांनाही निवडणूक खर्च वसूल करण्यासाठी ही निवडणूक एक प्रकारे पर्वणी ठरली आहे. काही ठिकाणी प्रत्येकी पाच लाख रुपये मतदारांना वाटण्यात आल्याचे सांगण्यात येते. विदर्भात एका उमेदवाराने प्रति नगरसेवक दोन ते पाच लाख रुपयांचे वाटप



केले आहे. काही मतदारसंघातील मतदारांना उमेदवारांनी सहल घडवून आणली आहे. नगरसेवकांचे सहलीचे प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रांवरून टीका झाली आहे.

नाशिकमध्ये महायुतीत वाद झाला होता. भाजपच्या बंडखोराने माघार घेण्यास नकार दिल्याने शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार अडचणीत आला होता. शेवटी या उमेदवाराच्या विरोधात साम, दाम, दंड याचा वापर केल्यावर त्याने माघार घेतली. साताऱ्यात जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपने शिवसेना व राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनाच दणका दिला होता. यामुळे हे दोन्ही पक्ष उट्टे काढण्याची शक्यता वर्तविली जाते. उद्या निवडणूक होणाऱ्या सर्व ११ मतदारसंघांमध्ये मतमोजणी सोमवारी होणार आहे.

# प्रहार शेतकरी संघटनेचा रास्ता रोको



**सोलापूर/वृत्तसंस्था**

मंद्रूप येथील अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याच्या घटनेतील आरोपींना तत्काल अटक करून कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी प्रहार शेतकरी संघटनेने सोमवारी सोलापूर- विजापूर राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. आंदोलनामुळे दोन्ही बाजूचा हायवे पूर्णपणे एक तास ठप्प झाला होता. प्रहार शेतकरी संघटनेचे शहर प्रमुख अजित कुलकर्णी, संपर्कप्रमुख जमीर शेख व कार्याध्यक्ष तायप्पा कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. मंद्रूप येथील अल्पवयीन मुलीच्या प्रकरणात पोलिसांनी अद्याप आरोपींना अटक न केल्याने संतप्त कार्यकर्ते रस्त्यावरच ठिय्या मांडून बसले.

आंदोलनाची माहिती मिळताच मंद्रूप पोलिसांनी घटनास्थळी मोठा बंदोबस्त तैनात केला. सुमारे दोन तास महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती.

# "उद्धव ठाकरेंनी केलेल्या चुकीमुळेच...", रामदास आठवलेंची प्रतिक्रिया

**मुंबई/वृत्तसंस्था**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या विधानावर आता केंद्रीय मंत्री आणि आरपीआय (ए) प्रमुख रामदास आठवले यांनी जोरदार पलटवार केला आहे. "उद्धव ठाकरे यांना आता स्वतःचे आमदार आणि खासदार सांभाळणे कठीण झाले आहे, कारण त्यांनी २०१९ मध्येच एक मोठी राजकीय चूक केली होती," असा टोला आठवलेंनी लगावला. नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील महायुती आणि दिल्लीतील एनडीएच्या (NDA) वाढत्या ताकदीवर मोठे विधान केले. २०१९ च्या विधानसभा





निवडणुकीनंतरच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करताना रामदास आठवले म्हणाले, "२०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदासाठी पाठिंबा देणे आवश्यक होते. जर त्यांनी तसे केले असते, तर ते स्वतः उपमुख्यमंत्री होऊ शकले असते. मात्र, त्यांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे आज त्यांच्यावर ही वेळ आली आहे."

पुढे बोलताना आठवले म्हणाले की, शिवसेनेच्या ९ पैकी ६ खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. यामुळे महाराष्ट्रात महायुतीची आणि केंद्रात एनडीएची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. देशातील राजकीय समीकरणांवर बोलताना रामदास आठवले यांनी विरोधकांच्या आघाडीत बिघाडी झाल्याचा दावा केला. "आता एक खूप चांगली गोष्ट घडली आहे; द्रमुकने (DMK) काँग्रेससोबतची आपली आघाडी तोडली आहे. एवढेच नाही तर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचे (TMC) अनेक खासदार आमच्यासोबत आले आहेत, आणि आम आदमी पक्षाचे (AAP) लोकसभा सदस्यही लवकरच आमच्यासोबत येऊ शकतात," असा खळबळजनक दावा आठवलेंनी केला आहे.

केंद्रातील महत्त्वाच्या घडामोडींवर प्रकाश टाकताना आठवले म्हणाले की, मोदी सरकार महिला आरक्षणाशी संबंधित (नारी शक्ती वंदन अधिनियम), 'मतदारसंघ पुनर्रचना विधेयक' संसदेत मंजूर करणार आहे. हे विधेयक निश्चितपणे मंजूर होईल आणि यावेळी संसदेत आमच्याकडे दोन-तृतीयांश बहुमत असेल, असा विश्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोरं परत का आणलीस?" जुनेखेडमध्ये किरकोळ वादातून पोटच्या मुलाचा निर्घृण खून!



**ईश्वरपूर/वृत्तसंस्था**

जुनेखेड येथे पारध्यांतील कौटुंबिक वादातून वडील व भावाने कपिल झाझम्या पवार (वय ३५, रा. जुनेखेड) या तरुणाचा कोयत्याने वार करुन निर्घण खून केला. ही घटना सोमवारी रात्री साडे आठ वाजता सरकारी दवाखान्याच्या मागे राहत्या घरी घडली. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

झाडाम्या कस्ताण्या पवार (वय ६०) व भाऊ अजय ऊर्फ अझरुद्दीन झाझम्या पवार (वय २३, दोघे रा. जुनेखेड) अशी संशयित आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कपिल पवार याची मुले ईश्वरपूर येथे आश्रमशाळेत शिक्षण घेत असून उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त घरी आली होती. शाळा सुरू होणार असल्याने सोमवारीमुलांना सोडण्यासाठी तो ईश्वरपूर येथे गेले होते. मात्र शाळेकडून गुरुवारी मुलांना पाठविण्याची सूचना मिळाल्याने तो मुलांना घेवून पुन्हा घरी आला.

सायंकाळी घराबाहेर मुलांच्या कारणावरून कपिल पवार व त्यांचे बडील झाझम्या पवार यांच्यात बाद सुरू झाला. तुझी पोर तु शाळेत न सोडता, परत का घेऊन आलास, ती इथे असली मजी गप रहात नाहीत, तुझ्या पोराने बोरगांव येथून खेळण्याचा लाकडी गाडा उचलून आणला आणला आहे, म्हणतवडील व भावाने भांडणे केली.

रात्री आठच्या सुमारास हा वाद विकोपाला गेला. त्यावेळी झाझाम्या पवारने कपिलच्या कानाजवळ कोयत्याने वार केला. त्यानंतर दोघांमध्ये झटापट सुरू झाली. याचवेळी अजय ऊर्फ अझरुद्दीन पवार हा हातत विळा घेऊन आला व त्याने कपिल पवार याच्या मानेवर, डोक्यात, हातावर आणि पाठीवर सपासप वार केले.

यामध्ये गंभीर जखमी झालेल्या कपिल पवार याला उपचारासाठी ईश्वरपूर येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. या प्रकरणी पत्नी प्रिती कपिल पवार यांनी ईश्वरपूर पोलिस ठाण्यात दिली असून पोलिसांनी दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ईश्वरपूर पोलीस करीत आहेत.

## गुटखाबंदी असतानाही लोटे परिसरात लाखोंचा गुटखासाठा?



**खेड/वृत्तसंस्था**

तालुक्यातील लोटे एमआयडीसी परिसरात सर्रासपणे गुटखा विक्री सुरू आहे. गुटखा रॅकेटचा पर्दाफाश करत गोदामामधून गुटखा साठा केलेला प्रकार भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संजय आखाडे यांनी उघडकीस आणला. संबंधित व्यावसायिकावर मकोका अंतर्गत कारवाई न झाल्यास आक्रमकतेचा अवलंब करण्याचा इशारा भाजपचे नेते वैभव खेडकर यांनी दिला आहे.

लोटे एमआयडीसी परिसरातून रात्रीच्या वेळी गुटख्याची राजरोसपणे वाहतूक सुरू असल्याचा आरोप भाजपने केला आहे. केरळ व गोवा येथून गुटखा आणून स्थानिक विक्रेत्यांना तो विकला जात आहे. याचमुळे राज्यात गुटखा विक्री बंद असतानाही येथील परिसरातील पान टपऱ्यांवर मात्र, तरुणांना गुटखा उपलब्ध करून दिला जात आहे. यामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत असतानाही प्रशासनाकडून मात्र, कुठलीच कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. प्रशासनाला हा सबळ पुरावा पुरेसा आहे. मात्र, तरी देखील अजून पुरावे हवे असल्यास दिले जातील, असेही भाजपडून स्पष्ट करण्यात आले. यामुळे गुटख्याचा साठा करून विक्रेत्यांना गुटखा पुरवठा करणाऱ्या व्यावसायिकांवर कोणती कारवाई करते, याकडे नजरा रोखल्या आहेत.

## काम संपवून घरी परतणाऱ्या शिक्षिकेचा विनयभंग

**पिंपरी :** जनगणनेचे काम संपवून घरी परतणाऱ्या खासगी संस्थेतील शिक्षिकेला क्षेत्रीय कार्यालयातच थांबवून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शिक्षिकेने निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ४५ वर्षीय कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित कर्मचारी हा महापालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालयात नियुक्तीस आहे. पिडीत शिक्षिका शहरातील एका खासगी शिक्षण संस्थेत नियुक्तीला आहे. शासनाच्या आदेशानुसार जनगणनेचे काम खासगी शिक्षकांना देखील देण्यात आले आहे. हे काम संपवून पिडीत शिक्षिका 'फ' क्षेत्रीय कार्यालयातून घरी परतत असताना आरोपीने शिक्षिकेला थांबवून 'दिवसभर रजा टाक. आपण दोघे बाहेर जाऊ' असे म्हणत जवळीक साधण्याचा प्रयत्न करून विनयभंग केला. निगडी पोलीस तपास करीत आहेत.

पदाधिकाऱ्यांकडून प्रशासनाची झाडाझडती

या विनयभंगाच्या घटनेवरून पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांसह सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेत प्रशासनाची झाडाझडती घेतली. अशा घटनांमुळे महापालिकेची बदनामी होत आहे. प्रशासनाच्या चुकीच्या कामांमुळे पदाधिकाऱ्यांनाही बदनामीला सामोरे जावे लागत आहे.

## युवकाची निर्घूण हत्या; युवकाचा खून करुन मृतदेह रेल्वे रुळावर

**पंढरपूर/वृत्तसंस्था**



पंढरपूर शहरात धक्कादायक आणि शहारे आणणारी खुनाची घटना घडली. एक युवकाला मारहाण करून खून करण्यात आला. त्यानंतर त्याचा मृतदेह रेल्वे रुळावर ठेवण्यात आला. शिवाय त्याचा एक पाय कापून त्याच्या घराच्या दरवाजावर टांगण्यात आला.

या हत्येने शहर व परिसरात दहशतीचे, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खुनाची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. रोहित मधुकर कोंरे (वय २४, रा. अनिलनगर झोपडपट्टी) असे मृताचे नाव आहे. त्याचा काही युवकांशी सोमवारी रात्री वाद झाला होता. हे भांडण दोन महिन्यांपासून सुरू होते. त्यावेळी काही युवकांनी त्याला ठार मारण्याची धमकीदेखील दिली होती. यावर रोहितने घरच्या लोकांना भांडणे वाढण्याची शक्यता बोलून दाखवली होती. पुन्हा सोमवारी रात्री साडेअकरा वाजता काही युवक भांडणे मिटवायची आहेत, असे सांगत त्याला घरातून घेऊन गेले आणि रोहितला दारू पाजली. रोहितला नदीजवळ रेल्वे पुलावर नेऊन मारहाण करून ठार मारण्यात आले. त्यानंतर त्याचा मृतदेह रेल्वे रुळावर फेकून देण्यात आला. एवढ्यावर न थांबता मारेकऱ्यांनी रोहितचा उजवा पाय कापून चक्क त्याच्या मावशीच्या घराच्या दारावर टांगला होता. या हत्याकांडाने पंढरी हादरून गेली. दरम्यान, रोहितची आई आणि नातेवाईकांनी हत्येतील गुन्हेगारांना पकडत नाही, तोपर्यंत अंत्यसंस्कार होणार नाहीत, असे बजावले आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे तपास करीत आहेत. अनिलनगर परिसर हा गुन्हेगारी व अवैध व्यवसायाचा अड्डा बनला आहे. या परिसरात दररोज भांडणे, हाणामारीच्या घटना घडतात. काही महिन्यांपूर्वी एका कुरिअर सेवकाचा आणि त्याच्या आईचा घरात घुसून कोयत्याने वार करून निर्घूण खून करण्यात आला होता. या घटनेतील संशयित आरोपी सहा महिन्यांनी इंस्टाग्रामवर करण्यात आलेल्या एका पोस्टमुळे सापडले होते.

## कवठेमहांकाळ पोलिसांची धडाकेबाज कारवाई; पिस्तूल, काडतूस आणि दोन तलवारी जप्त

**कवठेमहांकाळ/वृत्तसंस्था**

कवठेमहांकाळशहरात एक देशी बनावटीचे पिस्तूल, एक जिवंत काडतूस व दोन धारदार तलवारी तीन आरोपींकडून जप्त करण्यात कवठेमहांकाळ पोलिसांना यश आले आहे.

याबाबत माहिती अशी की, सोमबार १५ जून रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दत्तात्रय कोळेकर, पोलिस हेडकॉन्स्टेबल करे, पोलिस नाईक मासाळ, पोलिस शिपाई करांडे, पोलिस शिपाई कासार असे कवठेमहांकाळ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रालिंग करताना पोलिस शिपाई कासार यांना खास बातमी मिळाली की, एका पांढऱ्या रंगाच्या अल्टो कारमध्ये तीन इसम बेकायदा पिस्तूल व तलवारी विक्री करणेकरीता येणार असलेबाबत माहिती मिळाल्याने निरीक्षक प्रविणकुमार कांबळे यांचे आदेशाप्रमाणे जाधव बस्ती, देशिंग रोड, कवठे महांकाळ येथील परिसरात सापळा लावला असता मिळालेल्या बातमी प्रमाणे एक पांढऱ्या रंगाची अल्टो कार क्र. एम एच १२ एल ही ७८३३ ही समोरुन येताना दिसली त्या गाडीस थांबवून पंचांसमन झडती घेतली असता आरोपी आयान आझाद शेख रा. शिंदिमळा,लव्हली सर्कलजवळ, सांगली याचे कमरेला पाठीमागील बाजुस एक पिस्तूल व खिश्यामध्ये एक जिवंत काडतूस मिळून आला.

तसचे अल्टो गाडीची झडती घेतली असता खाकी व लाल रंगाचे कपडयामध्ये दोन तलवारी मिळुन आल्याने त्यांच्याकडे तपास केला असता आरोपी असिफ अल्ताफ जमादार रा. गल्ली नं. ९ श्रीरामनगर विजयनगर सांगली, आयान आझाद शेख रा. शिंदिमळा, लव्हली सर्कलजवळ, सांगली, शफिक लतिफ पाशा रा.कुरणे गल्ली, शिंदिमळा, सांगली यांनी मिळून तलवार व पिस्टल विक्री करण्याकरीता आणलेचे सांगितले त्यामुळे त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# टीम इंडियाचा अफगाणवर 170 धावांनी विजय

## २-० ने आघाडी : सामनावीर गिल, इशान किशनची शतके : अर्शदीप, ब्रारचे प्रत्येकी ३ बळी

**लखनौ/वृत्तसंस्था**

येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या वनडेत भारताने अफगाणवर 170 धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह तीन सामन्यांच्या मालिकेत टीम इंडियाने 2-0 अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना शुभमन गिल आणि इशान किशनच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने 402 धावा केल्या. विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाण संघ 232 धावांत ऑलआऊट झाला. उभय संघातील तिसरा व औपचारिक शेवटचा सामना दि. 20 रोजी होईल.

भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. भारताकडून यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा ही सलामी जोडी मैदानात उतरली. पण जैस्वालने 4 धावांवर विकेट गमावली. यानंतर रोहित शर्मा आणि शुभमन यांनी 87 धावांची भागीदारी साकारली. ही जोडी जमलेली असताना अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असलेला रोहित माघारी परतला. त्याने 39 चेंडूत 6 चौकार आणि 2 षटकारासह 48 धावांचे योगदान दिले.

रोहित बाद झाल्यानंतर शुभमन गिल आणि ईशान किशन यांनी आक्रमक फलंदाजी केली. त्यांनी चौकार-षटकारांचा पाऊस पाडताना द्विशतकी भागीदारीही केली. यादरम्यान 33 व्या षटकात गिलने 77 चेंडूत, तर इशान किशनने 71 चेंडूत शतक पूर्ण केले. शुभमनचे हे वनडेतील नववे तर इशानचे दुसरे शतक ठरले. शतकानंतरही दोघेही आक्रमक खेळत होते. यादरम्यान, अफगाणिस्तानविरुद्ध भारताकडून वनडेतील सर्वोत्तम 224 धावांची भागीदारी झाली. शतकानंतर इशान किशन मात्र बाद झाला. त्याने 79 चेंडूत 14 चौकार आणि 7 षटकारासह 125 धावा फटकावल्या. इशान बाद झाल्यानंतर गिलने मात्र आपली लय कायम ठेवताना दीडशतकही पूर्ण केले. गिलने 110 चेंडूत 22 चौकार आणि 2 षटकारासह 154 धावा केल्या. त्याला खरोटेने बाद केले.

गिल बाद झाल्यानंतर मात्र भारताने नियमित अंतराने विकेट्स गमावल्या 45 व्या षटकात उपकर्णधार श्रेयस अय्यरला नांगेयालिया खरोटीनेच 26 धावांवर माघारी धाडले. त्यानंतर गुरनूर ब्रार (3), अर्शदीप सिंग (3), वॉशिंग्टन सुंदर (19) आणि यांना राशीद खान आणि अल्लाह गझनफर यांनी स्वस्तात बाद केले. शेवटच्या षटकात प्रिन्स यादव (5) धावबाद झाल्याने भारताचा डाव 49.5 षटकात 402 धावांवर संपला.



टीम इंडियाने विजयासाठी दिलेल्या 403 धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानला 44.3 षटकात सर्वबाद 232 धावाच करता आल्या. डार्विश रसूली फलंदाजीदरम्यान दुखापतग्रस्त झाल्याने पुन्हा फलंदाजीला आला नाही. त्यामुळे अफगाणिस्तानचा डाव 9 व्या विकेटनंतर संपला. अफगाण संघाकडून रेहमात शाहने सर्वाधिक 79 धावांचे योगदान दिले. याशिवाय, सादिकउल्लाह अटलने 42 तर रेहमानुल्ला गुरबाजने 41 धावांचे योगदान दिले. इब्राहिम झद्रन 21 धावा करुन बाद झाला. इतर अफगाण फलंदाज मात्र भारतीय गोलंदाजासमोर अपयशी ठरले.

### टीम इंडियाची विश्वविक्रमाशी बरोबरी

वनडे क्रिकेटमध्ये 400 धावांचा टप्पा ओलांडण्याची भारतीय संघाची ही 8 वी वेळ होती. यामुळे वनडेत सर्वाधिकवेळा 400 धावा करणाऱ्या संघांच्या यादीत भारताने अव्वल क्रमांकावरील दक्षिण आफ्रिकेशी बरोबरी केली आहे. आफ्रिकेने 8 वेळा वनडेत 400 धावा पार केल्या आहेत. या यादीत भारत आणि दक्षिण आफ्रिका पाठोपाठ इंग्लंड (7 वेळा) दुसऱ्या आणि ऑस्ट्रेलिया (3 वेळा) तिसऱ्या क्रमांकावर आहे.

# पिकलबॉल विश्वचषकात युवा संघ जाहीर

**मुंबई/वृत्तसंस्था**

या वर्षाच्या उत्तरार्धात होणाऱ्या पिकलबॉल विश्वचषकासाठी अर्जुन सिंग आणि वीर शाह यांची अनुक्रमे 19 खालील (यु 18) आणि 14 वर्षाखालील (यु 14) गटांमधील भारतीय कर्णधार म्हणून बुधवारी निवड करण्यात आली. अहमदाबादमध्ये 12 ते 14 जून या कालावधीत झालेल्या अधिकृत निवड चाचण्यानंतर या संघाची घोषणा करण्यात आली. हा विश्वचषक 30 ऑगस्ट ते 6 सप्टेंबर दरम्यान व्हिएतनाममधील दा नांग येथे होणार आहे.

भारतीय संघ अत्यंत मजबूत दिसत आहे आणि आम्हाला खात्री आहे की आम्ही मागील वेळच्याकामगिरीपेक्षा चांगली कामगिरी करू शकू, असे अर्जुन म्हणाला. दा नांग हे आमच्यासाठी एक खरे कसोटीचे मैदान ठरेल. हा स ंघ प्रचंड जिद्दीने खेळेल, अभिमानाने तिरंगा फडकवेल आणि मायदेशातील असंख्य मुलांना पॅडल (खेळाचे




साधन) हाती घेण्यास प्रेरित करेल. असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे, असे आयपीएचे अध्यक्ष सूर्यवीर सिंग भुल्लर यांनी सांगितले.

18 वर्षाखालील संघ: अर्जुन सिंग, आदित्य सिंग, नाओमी अमलसाडीवाला, देव शाह पूर्वांश पटेल, विवान पटेल, आश्रिता राजू आणि दिया मट्टीपती. 14 वर्षाखालील संघ- वीर शाह विरंश चोप्रा, आरिन बल्लानी, माहिका राठोड, मानसी कार्तिक आणि आश्रिता एस.

# अफगाण अ ला हरवून भारत अ अंतिम फेरीत

**दुबई/वृत्तसंस्था**

कर्णधार तिलक वर्मा, प्रियांश आर्य आणि कुमार कुशाग्र यांच्या अर्धशतकांच्या जोरावर 9 बाद 319 धावांचा डोंगर उभारल्यानंतर भारत अ च्या गोलदांजांनी एकत्रित कामगिरी करत अफगाण अ चा डाव 36.5 षटकांत अवघ्या 218 धावांत गुंडाळला. या शानदार अष्टपैल कामगिरीमुळे भारत अ ने 101 धावांनी विजय मिळविला आणा तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीतील स्थानही निश्चित केले. गोलंदाजांमध्ये निशांत सिंधूने सर्वाधिक प्रभावी कामगिरी करत 6.5 षटकांत 31 धावांत 4 बळी घेतले तर वेगवान गोलंदाज यश ठाकुरने 7 षटकांत 48 धावा देत 2 बळी टिपले. अन्शुल कंबोज, विपराज निगम, सूर्यांश शेडगे आणि अनुकुल रॉय यांनी प्रत्येकी 1 बळी घेतला. अफगाणतर्फे बाहिर शाहने 52 चेंडूत 4 चौकार, 1 षटकारासह 57, फैसल शिनोझादाने 46 धावा केल्या. उर्वरित फलंदाजांना मिळालेल्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रुपांतर करता आले नाही.

या विजयामुळे भारत अ ला दोन महत्त्वपूर्ण गुण मिळाले आणि त्यांची एकूण गुणसंख्या चारवर पोहोचली. मागील दोन सामने गमावल्यानंतर या विजयाने त्यांना अंतिम फेरीत धडक मारण्यास मदत केली. यश ठाकूरने इंडिया अ ला पहिले यश मिळवून दिले. त्याने तिसऱ्या षटकात अफगाणचा सलामीवीर हसन ईसाखिलला 14 धावांत ऋतुराज गायकवाडकरवी झेलबाद केले. त्यानंतर दुसऱ्या



बळीसाठी भारतीयांना फार काळ वाट पहावी लागली नाही. सहाव्या षटकांत कंबोजने तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या खालिद तनीवालला 13 धावांवर बाद केले तर दहाव्या षटकांत सिंधूने कर्णधार इम्रान मीरची विकेट घेतली. शिनोझादा आणि बाहिर यांनी चौथ्या गड्यासाठी 87 धावांची भागिदारी करून अफगाणचा डाव सावरला. परंतु त्यानंतर दोघेही लागोपाठ बाद झाल्याने त्यांच्या विजयाच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आणि त्यांचा डाव कोलमडला.

# महिलांनी नेदरलँड्सचा ९५ धावांनी उडवला धुव्वा; श्रीचरणीचे ४, शेफालीचे ३ बळी

**लीड्स/वृत्तसंस्था**

भारताने नेदरलँड्सला 95 धावांनी पराभूत करून महिला टी-20 विश्वचषकात सलग दुसरा विजय नोंदवला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिलांनी 20 षटकांत 5 बाद 209 धावा केल्या, जी या स्पर्धेतील त्यांची सर्वोच्च धावसंख्या आहे. प्रत्युत्तरात, नेदरलँड्सचा संघ 17.3 षटकांत 114 धावांवर सर्वबाद झाला. या विजयासह भारतीय संघ अ गटात चार गुणासह अव्वल स्थानावर आहे.

प्रथम फलंदाजी मिळाल्यावर स्मृती मानधना आणि शेफाली वर्मा यांनी अवघ्या 11.4 षटकांत पहिल्या विकेटसाठी 115 धावांची विक्रमी भागीदारी रचली. शेफाली वर्माने 38 चेंडूंत शानदार 55 धावा केल्या; तिच्या या खेळीत 10 चौकारांचा समावेश होता. दरम्यान, स्मृती मानधनाने डच




गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. तिने केवळ 47 चेंडूंत 74 धावांची खेळी केली, ज्यामध्ये 11 चौकार आणि एका उत्तुंग षटकाराचा समावेश होता. या स्पर्धेतील तिचे हे सलग दुसरे अर्धशतक ठरले. याशिवाय, जेमिमाने 19, रिचा घोषने नाबाद 20 तर हरमनप्रीत कौरने 12 धावा केल्या. या जोरावर भारताने 5 बाद 209 धावांचा डोंगर उभा केला. टी-20 वर्ल्ड कपमधील भारताची ही सर्वोच्च धावसंख्या आहे. टीम इंडियाने विजयासाठी दिलेल्या 210 धावांचा पाठलाग करताना नेदरलँड्सला 17.3 षटकात सर्वबाद 114 धावाच करता आल्या. नेदरलँड्सच्या महिला संघाकडून कर्णधार बॅबेट डी लीड हिने सर्वाधिक 28 धावांचे योगदान दिले. दुसरीकडे, नेदरलँड्स संघातील सात फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. त्यांचे शेवटचे सात फलंदाज फक्त 23 चेंडूत बाद झाले. भारताकडून गोलंदाजीमध्ये श्री चरणीने 4 आणि शेफाली वर्माने 3 बळी घेतले. भारताचा पुढील सामना 21 रोजी दक्षिण आफ्रिकाविरुद्ध होणार आहे.

**संक्षिप्त धावफलक :** भारतीय महिला 20 षटकांत 5 बाद 209 : स्मृती मानधना 47 चेंडूत 74, शेफाली वर्मा 38 चेंडूत 55, जेमिमा 13 चेंडूत 19, रिच घोष 8 चेंडूत 20, हरमनप्रीत 9 चेंडूत 12, दीप्ती शर्मा 2 चेंडूत नाबाद 10, अवांतर 16. कॅरोलिन डी लांजे 2-32, हीदर सीजर्स 1-31, मीर्थ व्हॅन डेन राड 1-37.

नेदरलँड्स महिला 17.3 षटकांत सर्व बाद 114 : हीदर सीजर्स 16 चेंडूत 21, फिबी मोल्केनबोअर 15, बॅबेट डी लीड 28, स्टेरे कॅलिस 13 चेंडूत 18, अवांतर 6. नंदनी शर्मा 2-22, शेफाली वर्मा 3-20, श्रीचरणी 4-19, दीप्ती शर्मा 1-26.

टी-20 वर्ल्ड कपमध्ये अर्धशतक व 3 बळी टिपणारी शेफाली वर्मा ही एकंदर तिसरी खेळाडू. याआधी हेली मॅथ्यूज व सुने लुस यांनी हा पराक्रम केला आहे. एकाच टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात अर्धशतक व 3 बळी टिपणारी शेफाली ही अनुजा पाटीलनंतरची भारताची दुसरी खेळाडू आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 42 लाख खर्च, शाहरुख खान मदतीला धावून आला! 'देऊळबंद 2'साठी पैसे नव्हते, प्रवीण तरडे म्हणाले..



देऊळबंद २' सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालतोय. या सिनेमाचा गेल्या महिन्याभराचा बॉक्स ऑफिसवरील प्रवास पाहता लवकरच 'देऊळबंद २' १०० कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री घेईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या चित्रपटाला भरभरून यश मिळाल्यावर सर्वत्र प्रवीण तरडे आणि टीमचं कौतुक करण्यात येत आहे. पण, सिनेमा रिलीज होण्यापूर्वी परिस्थिती पूर्णपणे वेगळी होती. 'देऊळबंद २'साठी तरडेंकडे पैसे नव्हते...या कठीण परिस्थितीत शाहरुख खानसह त्याच्या रेड चिलीज कंपनीने साथ दिल्याचं, प्रवीण तरडेंनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितलं.


प्रवीण तरडे अभिजात मराठी फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत सांगतात, "देऊळबंद २' सिनेमाचा DCP (Digital Cinema Package एखादा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित करण्यासाठी वापरला जाणारा डिजिटल फॉरमॅट) काढायचा होता. पण आमच्याकडे पैसे नव्हते. तेव्हा शाहरुख खान साहेबांसह त्याच्या रेड चिलीज कंपनीने खूप मोठी मदत केली. आमचं बजेट होतं १२ लाखांचं पण, ते सगळं बिल एकूण ४२ लाखांचं झालं. आता एवढे पैसे कुठून आणणार? त्यानंतर मग आम्ही 'रेड चिलीज'ला विनंती केली होती की, मराठी सिनेमा आहे इतकं बजेट नाहीये. आम्हाला हा सिनेमा खूप भारी दाखवायचा होता...म्हणून आम्ही तुमची मदत घेतली."

प्रवीण तरडे पुढे म्हणाले, "शेवटी ही बातमी शाहरुख खान सरांपर्यंत पोहोचली. त्यांनी मग रेड चिलीजची तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्यांना नेमकं काय झालंय वगैरे विचारलं. शाहरुख साहेबांच्या टीमने त्यांना सांगितलं, सर 'मुळशी पॅटर्न'वाल्याचा चित्रपट आहे. आता भाईजानने आधीच 'अंतिम' सिनेमा रिमेक केल्यामुळे शाहरुखला 'मुळशी पॅटर्न' चित्रपट माहीत होता. मग त्यांनी टीमला विचारलं, हा नवीन चित्रपट कसा बनवलाय? त्यांच्या टीमने सांगितलं, खूप छान सिनेमा तयार केलाय, भावनिक सिनेमा आहे आणि आता DCP द्यायचीये. पण, त्यांच्याकडे पैसे नाहीयेत. पूर्ण पैसे दिल्याशिवाय DCP देत नाहीत हा नियम आहे."

"शाहरुख खानने कसलाही विचार न करता सांगितलं तुम्ही त्यांना DCP देऊन टाका. 'उनका बिल माफ करो...' चित्रपट चांगलाय, मग DCP देऊन टाका. रेड चिलीजने ४० ते ४५ टक्के बिल माफ केलं. मराठी सिनेमासाठी त्यांनी जे पाऊल उचललं, इतकी मोठी मदत केली...त्यामुळे शाहरुख खान आणि त्यांच्या संपूर्ण टीमचं मला खूप कौतुक आहे. पैसे सोडा...चित्रपट महत्त्वाचा हा त्यांचा विचार होता...हे आजच्या जगात किती महत्त्वाचं आहे."

"आता शाहरुखला हा सिनेमा दाखवायला मला खूप आवडेल. आता आमच्या सिनेमाला बॉक्स ऑफिसवर खूप यश मिळालं. कदाचित आता चित्रपट १०० कोटींची कमाई सुद्धा करेल...तेव्हा सगळेजण कौतुक करतील. पण, जेव्हा काहीच नव्हतं तेव्हा शाहरुखने केलेली मदत न विसरता येणारी आहे. सिनेमा हिट होईल किंवा फ्लॉप होईल हे सुद्धा त्यांना माहीत नव्हतं...तेव्हा त्यांनी मदत केलीये. मी त्यांचा कायम ऋणी असेन." अशा भावना प्रवीण तरडेंनी व्यक्त केल्या आहेत.

## "दररोज ३ तास वर्कआऊट..."




येत्या २९ जूनपासून 'विसरू नको तू मला' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये लोकप्रिय अभिनेता शाल्व किंजवडेकर आणि अभिनेत्री तन्वी मुंडले यांची फ्रेश जोडी ऑनस्क्रीन एकत्र झळकणार आहे. निसर्गसौंदर्याने नटलेल्या कोकणातल्या गुहागरमध्ये या मालिकेचं शूटिंग सुरू आहे. नयनरम्य लोकेशन्स...नवी जोडी आणि नवी लव्हस्टोरी असा तिहेरी योग जुळून आल्यामुळे प्रेक्षकांमध्ये या मालिकेविषयी कमालीची उत्सुकता आहे.

या मालिकेत शाल्व सूर्या तांडेल ही व्यक्तिरेखा साकारत आहे. नाखवा कुटुंबातील सूर्या हा घरातल्या प्रत्येकाचा लाडका, जबाबदार आणि कष्टाळू मुलगा आहे. बाहेरून रांगडा आणि कणखर वाटणारा सूर्या मनाने मात्र अत्यंत प्रेमळ, दिलदार आणि इतरांच्या मदतीला धावून जाणारा आहे. त्याच्या जन्मानंतर कुटुंबाच्या व्यवसायाला भरभराट मिळाली. त्यामुळे घरातील प्रत्येक शुभ कार्याची सुरुवात त्याच्या हस्तेच केली जाते. त्यामुळे तो केवळ कुटुंबाचा सदस्य नसून त्यांच्या आयुष्यातील लकी चार्म मानला जातो. सूर्या या व्यक्तिरेखेविषयी सांगताना शाल्व म्हणाला, "सूर्या हा नारळासारखा आहे. जो बाहेरून स्वभावाने कडक, कणखर वाटतो पण आतून तितकाच गोड आणि मोठ्या मनाचा आहे. या भूमिकेसाठी मी गेली चार महिने माझ्या फिजिकवर मेहनत घेत आहे. योग्य आहार आणि दररोज तीन तासांचा वर्कआऊट हा माझ्या आयुष्याचा भाग झाला आहे. सुरुवातीला मी इतका शिस्तबद्ध नव्हतो, पण या भूमिकेमुळे स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणता आला. सूर्या आणि त्याची गोष्ट प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच भिडेल असा मला विश्वास आहे."

## सैफबरोबर घटस्फोट झाल्यानंतर अमृता सिंगने दुसरे लग्न का केले नाही? स्वतःच केलेला खुलासा

सैफ अली खान लवकरच 'हैवान', 'रेस ४', या सिनेमांतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच सैफ अली खानचा कर्तव्य हा सिनेमा नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला होता. अभिनेता त्याच्या व्यावसायिक आयुष्याबरोबरच त्याच्या खासगी आयुष्यामुळेदेखील मोठ्या प्रमाणात चर्चेत असतो.



सैफ अली खानने २०१२ मध्ये करीना कपूरबरोबर लग्नगाठ बांधली. त्याआधी ते ५ वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. २००७ मध्ये त्यांनी एकमेकांना डेट करायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी लग्न केले. त्यांना आता दोन मुले आहेत. २०१६ मध्ये त्यांना पहिला मुलगा झाला. त्याचे नाव तैमुर असे आहे. तर, २०२१मध्ये त्यांना दुसरा मुलगा झाला. त्याचे नाव जेह असे आहे. करीना व सैफ प्रमाणेच तैमुर व सैफचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यांची एक झलक पाहण्यासाठी चाहते उत्सुक असतात.

करीनाबरोबर लग्न करण्याआधी सैफ अली खानने अभिनेत्री अमृता सिंगबरोबर लग्नगाठ बांधली होती. सैफ व अमृता सिंग यांची भेट 'बेखुदी'च्या सेटवर झाली होती. जरी सैफला चित्रपटातून बाहेर काढले असले तरी सैफ व अमृताला एकमेकांच्या संपर्कात होते. ते एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यांच्यात १२ वर्षांचे अंतर होते. १९९१ मध्ये त्यांनी लग्न केले. सैफ अली खान २१ वर्षांचा होता. त्यावेळी अमृता सिंगचे वय ३३ वर्षे होते. त्यांना दोन मुले आहेत. लग्नाच्या १३ वर्षांनंतर त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. २००४ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. घटस्फोटानंतर सैफ अली खानने दुसरे लग्न केले असले तरी, अमृता सिंगने दुसरे लग्न केले नाही. याबद्दल तिला एका मुलाखतीत तिला विचारले होते की, तुम्ही दुसरे लग्न करणार का? याबद्दल ती म्हणालेली, "मी १६ वर्षांची नाही. त्यामुळे मला लग्न करायचे आहे की नाही,याबद्दल माझ्या मनात गोंधळ नाही. प्रामाणिकपणे सांगायचे तर मला वाटत नाही की मी लग्न करेन. पण, माहित नाही की पुढे काय होईल. एक पुरुष जे मला देऊ शकतो, ते सगळे माझ्याकडे आहे.

## 'लगान' चित्रपटाने माझं करिअर बरबाद केलं; २५ वर्षांनंतर आमिर खानच्या सिनेमाबद्दल अभिनेत्याचा मोठा खुलासा

आशुतोष गोवारीकर यांच्या 'लगान' (२००१) या ब्लॉकबस्टर चित्रपटाने इतिहास रचला होता. या चित्रपटात काम करणाऱ्या प्रत्येक कलाकाराच्या करिअरला नवी दिशा मिळाली. मात्र, अभिनेता सिनेमात 'बाघा' ही भूमिका करणाऱ्या अमीन हाजी यांच्याबाबत असं घडलं नाही. अमीन हाजी यांना वाटतं की आमिर खानच्या या चित्रपटाने त्यांचं करिअर बरबाद केलं. अर्थात, या चित्रपटाने त्यांचं वैयक्तिक काहीच नुकसान झालं नाही, पण नंतर त्याहून मोठा हिट चित्रपट त्यांना करता आला नाही.

चित्रपट रिलीज होऊन आता २५ वर्षे झाली आहेत, तरीही अमीन यांच्यामते 'लगान'मधील मुक्या 'बाघा'इतकी प्रभावी आणि ताकदीची भूमिका त्यांना पुन्हा कधीच मिळाली नाही. "लगानने माझं करिअर बरबाद केलं, हेच सत्य आहे," असं अमीन म्हणाले.

अभिनेता अमीन हाजी यांनी या परिस्थितीचे वर्णन करण्यासाठी जगजीत सिंग यांच्या 'हजारों ख्वाहिशें ऐसी' या गझलच्या ओळी वापरल्या. ते म्हणाले, "हजारों ख्वाहिशें ऐसी के हर ख्वाहिश पे दम निकले... बहोत निकले मेरे अरमां, लेकिन फिर भी कम निकले." 'लगान'नंतरही अमीन यांना अनेक सिनेमाच्या ऑफर्स आल्या, पण त्यापैकी एकही भूमिका किंवा चित्रपट आमिर खानच्या 'लगान'च्या जवळपास जाणारी नव्हती. अमीन म्हणाले, "'लगान' संपल्यावर मला अभिनय करण्याची इच्छाच उरली नव्हती. मला ऑफर्स येत होत्या, पण चित्रपटाची स्क्रिप्ट किंवा माझी भूमिका 'लगान'सारखी प्रभावी वाटत नव्हती. एका टप्प्यावर आशुतोष गोवारीकर आणि माझी पत्नी शार्लटने मला विचारलं, 'तू आता पुढे काय करणार?' त्यावर मी म्हणालो, 'तुम्हीच मला सांगा,' कारण मला त्या सुमार ऑफर्स स्वीकारायच्या नव्हत्या."



अमीन पुढे म्हणाले, "मुळात, मला 'लगान'मुळे जो आदर-सन्मान मिळाला होता, तो मला खराब करायचा नव्हता. तसेच मी काही खूप मोठा किंवा उत्तम अभिनेता नाही. 'लगान'ची उत्तम स्क्रिप्ट, दिग्दर्शक आणि तिथली टीम यामुळेच मी चांगलं काम करू शकलो. त्या सर्वांनी मला खूप मदत केली." अमीन यांना भीती वाटत होती की इतर चित्रपटांच्या सेटवर लोकांना समजेल की ते काही फार मोठे अभिनेते नाहीत. अमीन यांची ही मनःस्थिती पाहून दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी त्यांच्यासमोर एक प्रस्ताव ठेवला. त्यांनी अमीन यांना चित्रपट लिहिण्याबद्दल विचारलं. तो चित्रपट म्हणजे शाहरुख खान मुख्य भूमिकेत असलेला 'स्वदेश' (२००४) होता. "तू माझ्याबरोबर 'देश' चित्रपट लिहिणार का?" असं आशुतोष यांनी विचारलं होतं. "त्या वेळी या चित्रपटाचं नाव 'देश' होतं.

मी आशुतोषला विचारलं, 'आशू, जगातील कोणत्याही लेखकाला तुझ्याबरोबर काम करावं वाटेल आणि तू मला विचारतोय?' त्यावर तो म्हणाला, 'तू नवीन कल्पनांवर चर्चा करण्यासाठी उत्तम व्यक्ती आहेस. तू प्रामाणिक आहेस आणि मी तुला याआधीही अनेक स्क्रिप्ट्स ऐकवल्या आहेत. तू माझ्याबरोबर 'लगान'मध्ये काम केलंय, त्यामुळे मला वाटतं की तू हे काम खूप छान करशील. तू माझ्याबरोबर 'स्वदेश'चा लेखक होशील का?' माझा तर यावर विश्वासच बसत नव्हता."

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई व पीक पेरणीचे नियोजन करा-जिल्हाधिकारी प्रविणकुमार देवरे

## जिल्हाधिकारी यांनी घेतला विविध विषयाचा आढावा

**जनसंचलन/बुलढाणा**

एल निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनचा पाऊस विलंबाने येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी आणि महसूल प्रशासनाने सतर्क राहून संभाव्य पाणीटंचाईचे योग्य नियोजन करावे. तसेच दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी घाईगडबडीने पिकांची पेरणी करू नये, यासाठी गाव पातळीवर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विविध महत्त्वाच्या विषयांच्या व्यापक आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अमितकुमार दुबे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक कौशलेंद्रकुमार सिंग यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत प्रामुख्याने संभाव्य पाणीटंचाईची पूर्वतयारी, लांबणीवर पडलेला पाऊस, खरिपाची पेरणी, बियाण्यांचे नियोजन, नैसर्गिक आपत्ती, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा आणि शेतकरी कर्जमाफी योजनेची प्रभावी अंमलबजावणी यावर




सविस्तर चर्चा करून नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत जमिनीत किमान ५ ते ६ इंच पावसाचे पाणी मुरत नाही (योग्य ओल निर्माण होत नाही), तोपर्यंत शेतकऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत घाईगडबडीत पेरणी करू नये. बियाणे वाया जाण्यापासून आणि दुबार पेरणीच्या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी ही खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. याविषयी महसूल व कृषी विभागाने गाव पातळीवर जनजागृती करावी, तसेच जिल्ह्यात खरीप हंगामासाठी दर्जेदार बि-बियाणांची कमतरता भासू नये म्हणून चोख नियोजन ठेवावे, असेही त्यांनी सांगितले. खरीप हंगामासाठी पात्र असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला विनाविलंब व सन्मानपूर्वक कर्जपुरवठा होईल याची पूर्ण दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी अग्रणी बँकेच्या व्यवस्थापकांना दिल्या. शेतकऱ्यांना बँकांमध्ये हेलपाटे मारावे लागू नयेत आणि कर्ज प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक बँक शाखेत स्वतंत्र कृषी मदत केंद्र सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

आगामी काळातील संभाव्य टंचाई लक्षात घेता सर्व तालुक्यांमध्ये पूर्वतयारी व आवश्यक उपाययोजनांचा कृती आराखडा तात्काळ राबवावा. जिल्ह्यातील नागरिकांना टंचाईच्या काळात सुरळीत पाणीपुरवठा होईल याचे चोख नियोजन करून आवश्यकतेनुसार तात्काळ टँकर उपलब्ध करून द्यावेत. यासोबतच जिल्ह्यातील जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्यात यावीत आणि पशुधनाला चारा टंचाई भासू नये म्हणून आत्तापासूनच आवश्यक चाऱ्याचे काटेकोर नियोजन करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिले.

राज्य शासनाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे आणि पारदर्शक रीतीने राबवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी अग्रीस्टॅक नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी प्रशासनाशी संपर्क साधून आपली अग्रीस्टॅक नोंदणी प्राधान्याने करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# बुलढाण्यात अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई; ४ लाख २६ हजारांचा दंड

**जनसंचलन/बुलढाणा**




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देत आणि शासकीय महसुलातील गळती रोखण्यासाठी जिल्ह्यात अवैध प्रवासी वाहतुकी विरोधात संयुक्त मोहीम राबविण्यात आली. अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या तब्बल ३०६ वाहनांवर कारवाई करत ४ लाख २६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती बुलढाणा विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी जयंत कांडलकर यांनी दिली. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार ५ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत ही विशेष मोहीम राज्यभर राबविण्यात आली. सदर मोहिम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासन, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता पथकाने संयुक्त कारवाईचा धडाका लावला. बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या तब्बल ३०६ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून पोलीस विभागाकडून २ लाख ८ हजार ५०० रुपये तर आरटीओ विभागाकडून २ कोटी १८ हजार असे एकूण ४ लाख २६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. या मोहिमेत इको, क्रुझर, मॅजिक, मॅक्झिमो, ट्रॅव्हल्स आदी वाहनांवर कारवाई करण्यात आली. मोटार वाहन कायद्यातील कलम १२२/१७७ (नो-पार्किंग व वाहतूक अडथळा), कलम १७९ (शासकीय आदेशाचे उल्लंघन) तसेच कलम ६६/१९२(अ) (विनापरवाना प्रवासी वाहतूक) अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात आली. या संयुक्त मोहिमेचा सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर दिसून आला आहे. अवैध वाहतुकीला आळा बसल्याने प्रवाशांनी पुन्हा एसटीला पसंती दिली असून बुलढाणा विभागाच्या महसुलात तब्बल ७३ लाख ९४ हजार ४७३ रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे. तसेच १ लाख १७ हजार ९७० हून अधिक प्रवाशांची वाढ झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. यापूर्वी बसस्थानकांच्या प्रवेशद्वारांवर व परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने व एजंटांचा मोठा वावर असल्याने वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि महिला प्रवाशांची गैरसोय होत होती. मात्र या मोहिमेनंतर बुलढाणा, खामगाव, चिखली, शेगाव, मलकापूर, मेहकर आणि जळगाव जामोद येथील प्रमुख बसस्थानके अतिक्रमणमुक्त व मोकळी झाल्याचे प्रशासनाने सांगितले. महिला प्रवाशांनीही या कारवाईचे स्वागत केले असून अवैध प्रवासी वाहनांच्या तुलनेत एसटी बसमधील प्रवास अधिक सुरक्षित असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. बुलढाणा व खामगाव येथील आरटीओ अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि एसटी सुरक्षा व दक्षता पथकाच्या संयुक्त प्रयत्नातून ही मोहीम यशस्वी झाली. प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात नियमभंग करताना आढळणाऱ्या वाहनांचे परवाने, परमिट आणि चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स किमान तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येतील.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## स्टॉप डायरिया अभियानाचा शुभारंभ...

# जिल्ह्यातील १.८४ लाख बालकांना झिंक गोळ्या व ओआरएसचे वितरण
# ३१ जुलैपर्यंत स्टॉप डायरिया अभियान...

**जनसंचलन/बुलढाणा**

पाच वर्षांखालील बालकांमध्ये अतिसार (डायरिया) या आजारामुळे होणारे मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत ङ्गस्टॉप डायरिया अभियानफ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील १ लाख ८४ हजार ६३३ बालकांना झिंकच्या गोळ्या आणि ओआरएस () द्रावणाचे वितरण करण्यात येणार आहे. अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन मंगळवारी आयुष्यमान आरोग्य मंदिर, पाडळी येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव तथा जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र पाडळीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल जवरे यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात आरोग्य सेविकांनी ओआरएस द्रावण तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर करून अतिसारग्रस्त बालकांच्या उपचारामध्ये त्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच आशा स्वयंसेविकांनी योग्य हात धुण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक सादर करत स्वच्छतेच्या सवयी आणि रोगप्रतिबंधाचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगितले. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील २ हजार ०८३ आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि विविध स्तरांवरील अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आशा स्वयंसेविकांमार्फत प्रत्येक पात्र बालकाच्या घरी भेट देऊन ओआरएस व झिंक गोळ्यांचे वितरण केले जाणार असून अतिसार प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, शासकीय आरोग्य संस्था तसेच अंगणवाडी केंद्रांचा या अभियानात सक्रिय सहभाग राहणार आहे. पालकांना अतिसार झालेल्या बालकांना तात्काळ ओआरएस द्रावण देणे, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार झिंक गोळ्यांचा वापर करणे, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा वापर करणे आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. यावेळी बोलताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी अतिसार हा बालमृत्यूचे एक प्रमुख कारण असल्याचे सांगून, योग्य वेळी उपचार, ओआरएसचा वापर आणि स्वच्छतेच्या सवयी यांमुळे या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळविता येते, असे नमूद केले. नागरिकांनी स्वच्छता राखून सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा वापर करावा तसेच अतिसाराची लक्षणे दिसताच तातडीने जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी अतिसार झालेल्या बालकांना भरपूर द्रवपदार्थ, ओआरएस द्रावण आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार झिंक गोळ्या देणे आवश्यक असल्याचे सांगितले. स्तनपान सुरू ठेवून वेळेवर उपचार घेतल्यास अतिसारामुळे होणारे गंभीर परिणाम टाळता येतात, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजेश धुताडमल, डॉ. शैलेश खंडारे, डॉ. शिवानंद शिंगाडे, समुदाय आरोग्य अधिकारी, जिल्हास्तरीय पर्यवेक्षक, आरोग्य सहाय्यक कर्मचारी, आरोग्य सहायिका, आशा स्वयंसेविका तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्य विभागाने ङ्गस्टॉप डायरिया अभियानफ यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# एमएसएमई अॅवार्ड २०२६ साठी विविध ९ प्रवर्गांमध्ये नामांकने आमंत्रित

**जनसंचलन/बुलढाणा**




महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागाच्या पुढाकाराने आणि जागतिक बँक सहाय्यित ( ) योजनेअंतर्गत २०२६ या राज्यस्तरीय भव्य परिषद व पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी ( ) वाशी, नवी मुंबई येथे करण्यात आले आहे. या सोहळ्यात राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग () क्षेत्रात उत्कृष्ट, नाविन्यपूर्ण आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उद्योजकांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. यासाठी विविध ९ प्रवर्गांमध्ये नामांकने मागविण्यात आली आहेत. पुरस्कार प्रवर्गांमध्ये तसेच यांचा समावेश आहे. सदर पुरस्कारांसाठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून ती अत्यंत सुलभ करण्यात आली आहे. राज्यातील तसेच बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजकांनी या संधीचा लाभ घेऊन नामांकन सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नामांकनासाठी इच्छुक उद्योजकांनी या संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाइन अर्ज भरावा. तसेच ही माहिती अधिकाधिक उद्योजकांपर्यंत पोहोचावी यासाठी विविध अधिकृत सोशल मीडिया माध्यमांद्वारे प्रसारित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे बुलढाणा जिल्ह्यातील उद्योजकांना राज्यस्तरावर ओळख मिळण्यास आणि त्यांच्या कार्याचा गौरव होण्यास मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

## २० व २१ जून रोजी स्पेशल ऑनलाईन प्लेसमेंट ड्राईव्ह; १० वी पास ते पदवीधरांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी

**जनसंचलन/बुलढाणा**




जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा यांच्या वतीने जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी दोन दिवसीय स्पेशल ऑनलाईन प्लेसमेंट ड्राईव्ह फॉर ई-श्रम टास्क आयोजित करण्यात आला आहे. हा ऑनलाईन रोजगार मेळावा २० आणि २१ जून २०२६ रोजी होणार असून, १० वी उत्तीर्ण ते पदवीधर उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये असफा ग्लोबल फायनान्स (बुलढाणा), क्रेडिट ग्रामीण लिमिटेड (बुलढाणा) आणि वैभव इंटरप्रायसेस (नागपूर) या कंपन्या सहभागी होत आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना बुलढाणा तसेच नागपूर जिल्ह्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. हा उपक्रम केंद्र सरकारच्या नॅशनल करिअर सर्व्हिस () पोर्टलशी संलग्न असून, गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करणाऱ्या उमेदवारांची माहिती थेट एनसीएस पोर्टलवर नोंदविण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांना भविष्यात त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार विविध सरकारी व खासगी नोकऱ्यांच्या संधींबाबत मोफत माहिती आणि अपडेट्स मिळत राहतील. इच्छुक उमेदवारांनी अधिकृत गुगल फॉर्मद्वारे निःशुल्क नोंदणी करावी. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर पात्र उमेदवारांशी मुलाखतीसाठी थेट दूरध्वनीद्वारे संपर्क साधला जाणार आहे. अधिक माहिती व पुढील अपडेट्ससाठी उमेदवारांनी कार्यालयाच्या अधिकृत व्हॉट्सॲप चॅनेलला जोडावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटरचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८